# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### अकोला वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालयासाठी मंजूर करण्यात आलेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) ९०४४ (१०-०६-२०२१) श्री.गोपीकिसन बाजोरीया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालयासाठी शासनाने मुंबई येथील सिध्दीविनायक मंदिर ट्रस्टतर्फे सन २०१७ मध्ये एमआरआय मशीन खरेदीकरीता रुपये ५ कोटी एवढा निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिध्दीविनायक ट्रस्ट हे शासनाच्या अधिन असल्यामुळे पाच वर्षापासून शासन व सिध्दीविनायक ट्रस्ट यांच्याशी पत्रव्यवहार करुनही रुपये ५ कोटीचा निधी प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालय हे नागपूरनंतर सर्वात मोठे रूग्णालय असून येथे पश्चिम महाराष्ट्रातील अनेक रुग्ण मोठ्या संख्येने येत असून एमआरआय मशीन नसल्याने गरजू रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अकोला वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालयासाठी एमआरआय मशीन खरेदीकरीता सन २०१७ साली मंजूर करण्यात आलेले रुपये ५ कोटी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) हाफकीन जीव औषध महामंडळामार्फत सदर यंत्राच्या खरेदीची निविदा प्रक्रिया सुरु आहे. तसेच रुपये ५ कोटी इतका निधी श्री.सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून यंत्राची प्रत्यक्षात खरेदी आदेशानंतर वितरीत करण्यात येणार आहे.

---

## हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्थेत मंजूर पदे रिक्त असल्याबाबत

**(२) ९२७४ (१७-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्थेसंदर्भात मागविण्यात आलेल्या माहितीनुसार, दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजीपर्यंत संस्थेत मंजूर १७३ पदांपैकी ५७ पदे रिक्त असल्याचे दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेत मंजूर १७३ पदांपैकी ५७ पदे रिक्त असून वर्ग "अ" अंतर्गत एकूण आठ पदनामांची २८ मंजूर पदे असून त्यापैकी २१ पदे रिक्त आहेत, वर्ग "ब" अंतर्गत २३ मंजूर पदांपैकी ७ पदे रिक्त आहेत आणि वर्ग "क" अंतर्गत ६८ पैकी ४७ पदे भरलेली असून २१ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदांमध्ये १ संचालक, १ उपसंचालक, ६ सहायक संचालक, ११ वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, १ वैज्ञानिक सचिव व १ मुख्य प्रशासकीय अधिकारी यांचा समावेश असून संचालक पद हे अनेक वर्षापासून रिक्त असल्यामुळे सदर पदाचा कार्यभार अतिरिक्त संचालकामार्फत पार पाडण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हाफकिन इन्स्टीटयुटमधील मूळ ३०६ मंजूर पदांपैकी १३३ पदे रद्द केल्यामुळे उर्वरित १७३ पदांपैकी ५७ पदे रिक्त राहिल्यामुळे संस्थेच्या कामकाजावर परिणाम होत असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, हाफकिन इन्स्टीटयुटमध्ये एवढया मोठ्या प्रमाणात पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर संस्थेस भेट देऊन केलेली पाहणी लक्षात घेता हाफकिन संस्थेचे पुनरुज्जीवन होण्याचेदृष्टीने तसेच रिक्त पदे भरणे बाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१३-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) सन २०१७-१८ मध्ये डॉ.माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय तज्ञ समिती नेमली होती. सदर समितीच्या शिफारशीप्रमाणे पदांची पदभरती नियमावली इतर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थेप्रमाणे सुधारीत करणे आवश्यक आहे. त्यांच्या शिफारशीप्रमाणे पदभरती नियमावली सुधारणेची कार्यवाही सुरु आहे.

(६) डॉ.माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय तज्ञ समितीच्या शिफारशीप्रमाणे सदर बाबीसंदर्भात केंद्र शासनासोबत चर्चा सुरु आहे.

---

## ग्रामपंचायत सदस्यांच्या भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबत

**(३) ९३३० (१५-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गावाच्या विकासात ग्रामपंचायत सदस्यांना मासिक सभेला रुपये २०० बैठक भत्ता दिला जात असून सदर बैठकीसाठी किमान रुपये १ हजार मानधन देण्याची तरतूद करावी अशी मागणी ग्रामपंचायत सदस्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामपंचायत सदस्यांच्या भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१६-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) ग्रामपंचायत सदस्यांच्या भत्त्यामध्ये वाढ करण्याची बाब सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील प्रलंबित कामांबाबत

**(४) ९३८९ (१५-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील बहुतांशी कामे अधिकारी व कंत्राटदार यांच्या हितसंबंधामुळे पूर्ण होऊ शकली नसल्याने प्रलंबित असलेल्या सर्व कामांची चौकशी करून दोषींविरूध्द कारवाई करण्यात यावी अशी मागणी अकोला येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी सन २०२० मध्ये विभागीय आयुक्त कार्यालय येथे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विहित मुदतीत कामे पूर्ण न करणारे कंत्राटदार व संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.
सदर मागणी/तक्रार विभागीय आयुक्त कार्यालयाकडे प्राप्त नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वैद्‌यकीय विद्‌यार्थ्यांसाठी कोरोनाच्या नव्या अभ्यासक्रमाच्या प्रस्तावाबाबत

**(५) ९४३१ (१७-०६-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनामुळे आरोग्य क्षेत्रात गेल्या वर्ष-दीड वर्षापासून झालेले बदल आणि त्यावर मात करण्यासाठी घ्यावयाची काळजी या विषयावर डॉक्टरांसाठी स्वतंत्र सहा महिन्याचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव औरंगाबाद शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालयाच्या (घाटी) अधिष्ठाता यांनी वैद्‌यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांकडे केला असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, “कोविड प्रतिबंधात्मक उपाय आणि व्यवस्थापन” असे या अभ्यासक्रमाचे नाव असावे, असे प्रस्तावित करत अतिदक्षता विभागात मनुष्यबळ वाढविण्यासाठी याचा उपयोग होईल असे प्रस्तावित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) असल्यास, अशा प्रकारचा अभ्यासक्रम राज्यातील इतर ई-वैद्‌यकीय महाविद्‌यालयामध्ये सुरू करण्याबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे. अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांनी मे, २०२१ मध्ये सचिव (वै.शि.), संचालक (वै.शि.) आणि कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे सदर अभ्यासक्रम सुरू करणेसाठीचा प्रस्ताव सादर केला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रस्ताव सध्या कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आला असून त्यावर विद्यापीठामार्फत निर्णय झाल्यानंतर शासनामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) अद्याप, याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षकांना कायमस्वरुपी पदोन्नती देणेबाबत

**(६) ९५२५ (१५-०७-२०२१) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षकांना माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान तात्पुरती पदोन्नती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायमस्वरुपी पदोन्नती न देता तात्पुरती पदोन्नती देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, नियमानुसार पदोन्नतीस पात्र असतानासुध्दा पदोन्नती देण्यासाठी झालेल्या विलंबास व शिक्षकांच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१७-१२-२०२१) :** (१) प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदावर तात्पुरत्या स्वरुपात ३६० दिवसांकरीता देण्यात आलेल्या तदर्थ पदोन्नतीचा कालावधी समाप्त झाला असल्याने एक दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुर्वलक्षी प्रभावाने शासन ज्ञापन दिनांक १२/०५/२०२१ अन्वये ३६० दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नतीचा कालावधी वाढवून देण्यात आला आहे.

(२) नियमित पदोन्नती देणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु असून सामान्य प्रशासन विभागाकडील आस्थापना मंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. दरम्यान भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निकषांची पुर्तता करणेसाठी आवश्यक त्या ठिकाणी नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत तदर्थ पदोन्नतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कोंडगांव (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील काजळी नदीवरील कोंडगांव-पुर्ये-तर्फे देवळे पूलाची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(७) ९५७१ (१५-०७-२०२१) श्री.अमोल मिटकरी : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ४९३२५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोंडगांव (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील काजळी नदीवरील कोंडगांव-पुर्ये-तर्फे देवळे हा पूल सद्य:स्थितीत नादुरुस्त असून त्याची रुंदी वाढवणे व पुनर्बांधणी करणे आवश्यक असून सदर पुलाच्या पुनर्बांधकामाबाबत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे, जून २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुल दोन पदरी बांधणेकरीता ६५८.०० लक्ष इतक्या खर्चाच्या रक्कमेचे अंदाजपत्रक जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्याकडून तयार करण्यात आले असून, जिल्हा परिषदेकडे रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीकरीता

विविध योजनामधून मर्यादित स्वरुपात निधी प्राप्त होत असून सदर निधीमधून एका पुलाच्या बांधकामासाठी एवढा निधी उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेद्वारे जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील उपलब्ध अनुदानामधून सदर पुलाच्या पुनर्बांधणीचे काम प्रस्तावित करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पुलाची सद्य:स्थिती पाहता भविष्यात होणारी दुर्घटना टाळण्याच्यादृष्टीने पुलाच्या पुनर्बांधकामाकरीता शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-११-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) जिल्हा परिषदेने दिनांक ११/०९/२०१९ व दिनांक १८/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदर पुलाचे काम जिल्हा वार्षिक योजनेतर्गत, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील उपलब्ध अनुदानामधून प्रस्तावित करणेबाबत विनंती केली आहे.

त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर पुलाचा रुपये ६६५.०० लक्ष किंमतीचा प्रस्ताव नाबार्ड-२५ व नाबार्ड-२६ अंतर्गत सादर केला आहे. तथापि, अद्याप मंजूरी अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कुंभारखाणी बु.कोंडराई धडा (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे संरक्षण भिंत उभारण्याबाबत

**(८) १०२०२ (०१-१०-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुंभारखाणी बु ।। कोंडराई धडा क्र. ५ (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील रस्त्यावरून सातत्याने अवजड वाहनांची वर्दळ सुरु असल्याने

भविष्यात रस्त्याच्या दोन्ही बाजूस डोंगराळ भागात वसलेल्या सुमारे २५ घरांवर दरड कोसळून तळये येथील दुर्घटनेची पुनरावृत्ती होवून जीवित आणि मालमत्ता हानी होण्याची शक्यता असल्याची गंभीर बाब दिनांक २८ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने नागरिकांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी सदरहू रस्त्यावर संरक्षण भिंत उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०२-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) मौजे कुंभारखाणी बु कोडराई धडा.५ हा रस्ता, रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार कुंभारखाणी ग्रामा क्र.२५ ते मधलीवाडी निम्मीवाडी हा रस्ता असून ग्रामीण मार्ग क्र.३७५ दर्जाचा आहे.

सदर रस्त्यावरील सा.क्र.०/२०० मध्ये दरड कोसळू नये म्हणून संरक्षण भिंत बांधणे आवश्यक आहे.

जिल्हा परिषदेला जिल्हा वार्षिक योजना २०२१-२२ अतिवृष्टी योजनेंतर्गत सदर ठिकाणी संरक्षण भिंत बांधण्यासाठी रुपये १०.०० लक्षची मंजूरी प्राप्त झाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय कार्यालयात व जिल्हा परिषदा येथे अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(९) १०२०४ (०१-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय कार्यालयात व जिल्हा परिषदा येथील अ,ब,क,ड वर्गाची हजारो/लाखो पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याऐवजी शासनाने कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून कामकाज चालविण्याचे कारण काय आहेत, तसेच, उक्त रिक्त पदे नियमित भरती प्रक्रियेद्वारे न भरल्याने राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षार्थींवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रिक्त पदे भरती प्रक्रियेद्वारे भरण्याबाबत शासनाची भूमिका काय असून शासन नियमित भरती प्रक्रिया केव्हा सुरू करणार आहे तसेच शासकीय कार्यालयातील व जिल्हा परिषदांमधील वर्गवारीनुसार एकूण किती पदे रिक्त आहेत याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२७-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) रिक्त पदांवर कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे कोणतेही धोरण नाही. तथापि, प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवण्यासाठी प्रशासकीय विभागांनी शक्य असेल तेथे पदनिर्मिती न करता कार्यालयातील जी कामे सहजरित्या बाहेरुन करुन घेणे शक्य आहे अशी कामे बाहययंत्रणेकडून (outsourcing द्वारे) करुन घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) माहे डिसेंबर, २०१९ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार शासकीय कार्यालयातील व जिल्हा परिषदांमधील गट अ, ब, क व ड या संवर्गातील पदोन्नती व सरळसेवेच्या मिळून एकूण १०,९९,१०४ पदांपैकी अंदाजे २,००,१९३ इतकी पदे रिक्त आहेत.

वित्त विभागाच्या दिनांक १६/०५/२०१८ च्या शासन निर्णयान्वये व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये शेतकऱ्यांना सुविधा पुरविण्यासाठी महत्वाच्या सेवेशी निगडित असलेली रिक्त पदे भरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम करण्यात आला आहे, त्या विभागांना वित्त विभागाच्या दिनांक २५/०५/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदींच्या अधीन राहून रिक्त पदे भरण्यास अनुमती आहे. तसेच रिक्त पदे भरण्याची तातडी व आवश्यकतेनुसार अपर मुख्य सचिव

(सेवा), सामान्य प्रशासन विभाग व अमुस/प्र.स (व्यय), वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीच्या मान्यतेने रिक्त पदे भरण्याची तरतूद आहे.

तसेच वित्त विभागाच्या दिनांक ३०/०७/२०२१ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील १०० टक्के रिक्त पदे भरता यावीत याकरीता वित्त विभागाच्या विविध शासन निर्णयान्वये पदभरतीवर घातलेल्या निर्बंधांमधून सुट देण्यात आली आहे.

त्यानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांकडून करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विभागीय मंडळाच्या अखत्यारितील सर्व पदांची भरती करण्याबाबत

**(१०) १०२३६ (२७-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) येथे घेण्यात आलेल्या कोविड आढावा बैठकीत मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी विभागीय मंडळाच्या अखत्यारितील सर्व पदांची तात्काळ भरती करण्यात यावी असे आदेश दिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विभागीय मंडळाच्या अखत्यारितील सर्व पदांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) माहे जुलै, २०२१ व माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सहायक प्राध्यापक संवर्गातील ४३ पदे तात्पुरत्या स्वरुपात संबंधित विभागीय निवड मंडळामार्फत भरण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पाच वर्षाखालील बालकांमधील कुपोषणासह अतिस्थूलता कमी करण्याबाबत

**(११) १०२७३ (२७-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाच वर्षाखालील बालकांमध्ये कुपोषणाची वाढ होत असून अतिस्थूलतेचे प्रमाणही एक टक्क्यावरुन ४ टक्क्यापर्यंत वाढल्याचे राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या पाचव्या अहवालातून (एनएफएचएस २०१९-२०) माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणातील निरीक्षणानुसार बालकांचे कुपोषणसह अतिस्थूलता कमी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१६-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

चौथे राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS) नुसार राज्यात अतिस्थूलतेचे प्रमाण १.९% होते, आणि पाचव्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS) नुसार राज्यात अतिस्थूलतेचे प्रमाण ४.१% एवढे आहे.

(२) पाचव्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS) अहवालाची नोंद घेऊन त्यानुषंगाने अतिस्थूलतेचे प्रमाण कमी करण्यासाठी करावयाची उपाययोजना संदर्भात आरोग्य विभागाशी समन्वय साधून कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१. एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना कोविड १९ मुळे गरम ताजा आहाराऐवजी THR अंतर्गत घरपोच आहार देण्यात येतो.

२. तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये अमृत आहार योजना सुरु असून ह्या योजनेंतर्गत गरोदर, स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील शाकाहारी बालकांना २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे आठवड्यातून ४ दिवस देण्यात येते.

३. तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बालविकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

४. राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दीदृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअलटाईममॉनिटरींग (ICT-RTM) व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सारथी संस्थेच्या पुणे येथील मुख्यालयीन इमारत व कोल्हापूर येथील उपकेंद्राच्या बांधकामाबाबत

**(१२) ११३८१ (२३-११-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अमोल मिटकरी, श्री.अरुण लाड** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शाहू महाराज प्रशिक्षण व मानव विकास (सारथी) (जि.पुणे) संस्थेच्या मुख्यालयाच्या इमारतीसाठी शासनाने शिवाजीनगर येथे जागा निश्चित करुन रुपये ४४,८३,५०,०००/- इतक्या रकमेची आर्थिक तरतुद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर येथे सारथी संस्थेचे उपकेंद्र उभारण्यासाठी शिवाजी विद्यापीठ येथील परिसरात २ एकर जागा निश्चित करुन राज्यात सारथी संस्थेसाठी अन्य आठ विभागीय कार्यालयांना देखील मंजूरी देवून त्याकरीता शासनाने रुपये १००० कोटी रकमेची तरतूद केल्याचे दिनांक २१ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सारथी संस्थेच्या मुख्यालयाच्या इमारतीच्या बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे काय, त्याची सद्य:स्थिती काय आहे, तसेच राज्यात आठ विभागीय कार्यालये कोणकोणत्या ठिकाणी बांधण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, शासनाने सन २०२१-२२ च्या पुरवणी मागण्याद्वारे केलेल्या आर्थिक तरतुदीनूसार पुणे येथील मुख्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाबाबत, कोल्हापूर येथील उपकेंद्राच्या बांधकामाबाबत तसेच सारथीच्या आठ विभागीय कार्यालयांना दिलेल्या मंजूरीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१३-१२-२०२१) :** (१) व (२) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) (जि.पुणे) कंपनीच्या मुख्यालयाच्या इमारतीकरीता भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे येथील ४१६३ चौ.मी जमिनीचा प्रत्यक्ष ताबा मिळाला असून, रुपये ४२,७०,००,०००/- (रुपये बेचाळीस कोटी सत्तर लक्ष) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) (जि.पुणे) या कंपनी करीता अर्थिक वर्ष सन २०२१-२२ मध्ये रुपये १५०.०१ कोटी अर्थसंकल्पीय तरतुद व पुरवणी मागणीव्दारे रुपये ४४.८३५० कोटी अशी एकूण १९४.८४५० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे त्यापैकी छत्रपती शाहू महाराज

संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) (जि.पुणे) या कंपनी करीता दिनांक २०/०८/२०२१ रोजी रुपये ५.०० कोटी वितरीत करण्यात आला आहे. तसेच कोल्हापूर येथे सारथी कंपनीचे उपकेंद्र उभारण्यासाठी २.०० हेक्टर शासकीय जमीन मिळणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) (जि.पुणे) कंपनीच्या भांबुर्डे शिवाजीनगर, पुणे येथील ४१६३ चौ.मी. जमिनीवर मुख्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) (जि.पुणे) कंपनीकडून सुरू करण्यात आलेली आहे. कोल्हापूर व लातूर येथे उपकेंद्र व पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व मुंबई या ६ मुख्यालय ठिकाणी विभागीय कार्यालये स्थापन करण्याचे नियोजित आहे. या नियोजित २ उपकेंद्रासाठी व ६ विभागीय कार्यालयाकरीता शासकीय जमीन मिळण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान केंद्राची क्षमता वाढविण्याबाबत

**(१३) १५१८० (०२-०५-२०१६) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान केंद्राची क्षमता वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(२) असल्यास, दोन वर्षापूर्वी सदर ठिकाणी ५६८ खाटांचे रुग्णालय निर्माण करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे का,

(३) असल्यास, अनुसंधान केंद्रात गेल्या १० वर्षापासून बाह्यरुग्णसेवा उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच तेथे आंतर रुग्णसेवा लवकर सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१८-११-२०२१) :** (१) नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान केंद्राच्या श्रेणीवर्धनासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेयो, मेडीकल सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल, डागा स्त्री रोग रुग्णालय व शासकीय दंत महाविद्यालय, नागपूर येथील उपकरणे खरेदीसाठी शासनाने दिलेला निधी परत गेल्याबाबत

**(१४) २९३४८ (१५-०४-२०१७) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेयो, मेडीकल सुपर स्पेशालिटी रुग्णालय, डागा स्त्री रोग रुग्णालय व शासकीय दंत महाविद्यालय, नागपूर येथील उपकरणे खरेदीसाठी शासनाने दिलेल्या निधीला प्रशासकीय मंजूरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपकरणे खरेदी प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने सदर निधी परत गेल्याचे दिनांक ०१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२९-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थास्तरावरुन यंत्र/उपकरणे खरेदी करण्यात आलेली असल्याने जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत निधी परत गेला नाही. परंतु राज्य योजनेंतर्गत रुपये ४२२/- फक्त एवढा निधी मार्च, २०१७ अखेरीस समर्पित करण्यात आला होता. तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील डागा स्मृती रुग्णालय, नागपूर येथील प्रशासकीय मान्यता प्राप्त यंत्रसामुग्रीची खरेदी प्रक्रिया सुरु

असताना शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १७/०१/२०१७ अन्वये दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत रुपये ५०,०००/- च्या वरील खरेदीस निर्बंध घालण्यात आले असल्याने रुपये २,६४,८९,४१७/- इतका निधी मार्च, २०१७ अखेरीस समर्पित करण्यात आला होता.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पॅरामेडिकल कायदा तयार करण्याबाबत

**(१५) ३५८०७ (०२-०१-२०१८) श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी पॅथॉलॉजीमध्ये रुग्णांकडून होत असलेली लूट थांबविण्याकरीता पॅरामेडिकल कायदा तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कायदयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, हा कायदा केव्हापर्यंत राज्यात लागू करण्यात येणार आहे ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१४-१२-२०२१) :** (१) राज्यातील परावैद्यकीय तंत्रज्ञांची नोंदणी व त्यांच्या कामाचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र परावैद्यकीय परिषद अधिनियम २०११ दिनांक ०१/०७/२०१७ पासून राज्यात अंमलात आला आहे.

(२) या अधिनियमातील तरतुदीनुसार राज्यामध्ये महाराष्ट्र परावैद्यकीय परिषद दिनांक १८/१०/२०१७ च्या अधिसूचने अन्वये स्थापित करण्यात आले आहे. या परिषदेकडून राज्यातील परावैद्यकीय तंत्रज्ञांची नोंदणी करण्यात येते. तसेच या तंत्रज्ञांकडून उक्त अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास त्यांची चौकशी करून संबंधित दोषीवर परिषदेकडून कारवाई करण्यात येते.

(३) अनुक्रमांक १ मध्ये नमुद केल्यानुसार.

---

## राज्यात विशेषत: कोल्हापूर जिल्ह्यात अंत्यविधीकरीता स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१६) ४१५७४ (०६-०८-२०१८) श्री.बाळाराम पाटील, श्री.अशोक उर्फ भाई जगताप श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १६ हजार गावांमध्ये स्मशानभूमी नसल्यामुळे लोकांना जागा मिळेल तेथे मृत व्यक्तींचा अंत्यविधी करावा लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील २१ गावे व १०० वाड्या वस्त्यांमध्ये स्मशानभूमी उपलब्ध नसल्याने मृतदेह शेतात व इतर मोकळ्या जागेत दहन केल्याने मृतदेहांची हेळसांड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंत्यविधीकरीता स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूण १०२५ ग्रामपंचायतीमधील २१ गावे व १०० वाड्यांवर स्मशानभूमी उपलब्ध नाही, हे खरे आहे. तथापि, मृतदेहांवर अंत्यसंस्कार करताना खाजगी किंवा ग्रामपंचायतीने उपलब्ध करून दिलेल्या जागेमध्ये पारंपरिक व विहित पध्दतीने अंत्यसंस्कार केले जातात, त्यामुळे मृतदेहांची हेळसांड होत नाही.

(३) व (४) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जनसुविधा योजनेतून सन २०१०-११ ते २०२०-२१ अखेर स्मशानशेड बांधणे व सोयीसुविधा उपलब्ध करणेसाठी निधी देण्यात आला असून १०२५ ग्रामपंचायतीपैकी ९७३ ग्रामपंचायतीमध्ये स्मशानभूमी आहेत. सन २०२०-२१ मध्ये स्मशानभूमी व अनुषंगिक २०७ कामे मंजूर असून त्यासाठी अंदाजित

रुपये ११.०० कोटी अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सदर कामे सुरू आहेत. याशिवाय रोजगार हमी योजना सन २०२१-२२ चा पूरक आराखडा व सन २०२२-२३ चा कृती आराखडा, १५ वा वित्त आयोग, जनसुविधा योजनामधून स्मशानभूमी व अनुषंगिक कामे घेण्यात आली आहेत.

---

## गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर तालुका ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(१७) ४२५०० (०२-०८-२०१८) श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिंपरी जि.चंद्रपूर तालुका ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी त्यांना वेतनश्रेणी लागू करण्यात यावी व पेन्शन योजना लागू करावी या दोन प्रमुख मागण्यांसह विविध मागण्यांच्या पुर्ततेसाठी एकदिवस काम बंद करुन आंदोलन केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१६-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ च्या कलम ६१ नुसार, ग्रामपंचायत कर्मचारी हे संबंधित ग्रामपंचायत मार्फत नियुक्त केले जातात. सदर कर्मचारी हे शासनाचे कर्मचारी नसून संबंधित ग्रामपंचायतचे कर्मचारी असल्याने शासनामार्फत चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे अणेदरी येथील विहिरीच्या बांधकामाबाबत

**(१८) ४७०२२ (०५-०७-२०१९) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अणदेरी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील गावमंदिराशेजारी असलेली सार्वजनिक विहिर माहे जून, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कोसळली असून ३ वर्षांपासून ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहिर बांधकामासाठी लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ यांनी गेल्या ३ वर्षांपासून मागणी करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर विहीर बांधकामासाठी तातडीने निधी मंजूर करुन अणेदरी गावातील ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) मौजे अणेदरी येथील सार्वजनिक विहीर कोसळली हे खरे आहे. तथापि, अणेदरी गावामध्ये नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणीपुरवठा होत असल्याने तेथील ग्रामस्थांना पाण्याची समस्या नाही.

(२) हे खरे आहे.

(३) विहीरीच्या पुनर्बांधणीचे अंदाजपत्रक जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी तयार केले आहे. निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही शक्य आहे. सद्य:स्थितीत मौजे अणेदरी येथे नळ पाणीपुरवठा योजनेतून गावातील वाड्यांना पाणीपुरवठा सुरू आहे व गावातील ग्रामस्थांना पुरेसे पाणी उपलब्ध होत असल्याने गावात पाणीसमस्या नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील जे.जे. रुग्णालयात व्हिसेरा अहवाल प्रलंबित असल्याबाबत

**(१९) ४७१२४ (०५-०७-२०१९) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, ॲड. अनिल परब :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालयात मागील सहा वर्षात तीन हजार व्हिसेरा अहवाल प्रलंबित असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त व्हिसेरा अहवाल प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०९-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ज.जी. समूह रुग्णालये, मुंबई या संस्थेमध्ये तपासणीसाठी येणारे शवविच्छेदन व्हिसेरांचे नमुने हे मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई व पनवेल महानगरपालिका यांच्या हद्दीतील तसेच रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग अशा अनेक ठिकाणाहून येत होते. परिणामी व्हिसेरांच्या नमुन्यांची संख्या जास्त व तूलनेने अपूरा कर्मचारी वर्ग यामुळे व्हिसेरांचे नमुने प्रलंबित होते.

(३) व (४) व्हिसेरांची प्रलंबित प्रकरणे निकालात काढण्याकरीता दिनांक २२/१२/२०२० अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये व्हिसेरा तपासणीचा अहवाल सादर करण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी जिल्हानिहाय वैद्यकीय महाविद्यालयाप्रमाणे पोलीस ठाण्यांची विभागणी करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत संस्थेतील व्हिसेरांची सर्व प्रलंबित प्रकरणे निकालात काढण्यात आली असून सध्या संस्थास्तरावर व्हिसेरा अहवाल प्रलंबित नाहीत.

---

## रायगड जिल्ह्यातील कोकण विकास पॅकेज कार्यक्रमांतर्गत वाडीजोड रस्त्याच्या प्रलंबित निधीबाबत

**(२०) ४७७९८ (०५-०७-२०१९) श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातून कोकण विकास पॅकेज कार्यक्रमांतर्गत वाडीजोड रस्ता निधीसाठी मागणी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रलंबित निधीबाबत मा.जिल्हाधिकारी, रायगड यांनी शासनास लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियोजन विभाग यांचेमार्फत कोकणातील वाडीजोड रस्त्याच्या मंजूर व झालेल्या कामाचा खर्च भागविण्याविषयी रुपये २८,५७,४३३/- इतकी रक्कम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोकणातील दुर्गम भागाला जोडण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या वाडीजोड रस्त्यासाठी प्रलंबित निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) व (२) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जि.प. रायगड आणि जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, रायगड यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार रायगड जिल्ह्यातून कोकण विकास पॅकेज अंतर्गत वाडीजोड रस्त्यासाठी निधीची मागणी केल्याचे तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांनी शासनास लेखी कळविल्याचे दिसून येत नाही. अशी मागणी या विभागाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई